# दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप बँकेचा
# आर्थिक अभ्यास

**स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**
**वाणिज्य शाखेच्या पीएच.डी. साठी सादर केलेला**
**संशोधन आराखडा**

संशोधक
**एम.एस. निर्मळे**
(एम.कॉम. एम.बी.ए., एम.फिल)

संशोधन मार्गदर्शक
**प्रा.डॉ.ए.डी.चव्हाण**
(एम.कॉम., एम.फिल, पीएच.डी.)
अधिव्याख्याता
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय
सोनपेठ जि.परभणी

**एप्रिल २०१६**

## १) प्रस्तावना :-

"विना सहकार नही उध्दार" हे ब्रीद वाक्य "दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक लि." या सहकारी बँकेने संपूर्ण महाराष्ट्रात बँकींग क्षेत्रात आपले एक आगळे वेगळे स्थान निर्माण करुन व आर्थिक विकासास गती देऊन सार्थ ठरवले आहे.

सहकार हा भारतासाठी नवीन नाही. भारतात स्वतंत्र पूर्व काळापासून म्हणजे १८ व्या शतकापासून सहकार चळवळ अस्तित्वात होती. भारतात २५ मार्च १९०५ रोजी पहिला सहकारी कायदा अस्तित्वात आला व महाराष्ट्रात १९४९ मध्ये पद्मश्री विखे पाटलांचा प्रवरानगर येथे पहिला सहकारी साखर कारखाना सुरु झाला व साखर कारखान्यानंतर सुतगिरणी व दुध उत्पादनासारख्या उत्पादनात सहकाराची मुळे रोवल्या गेली. आज बँक व्यवसायात सुध्दा सहकाराने आपली धमक दाखवून दिलेली आहे. बऱ्याच सहकारी बँकांनी यशस्वी व्यवसाय करुन दाखवून इतर उद्योगांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. मराठवाडा विभागात महाराष्ट्र स्वातंत्र होण्या अगोदर म्हणजे १९६० पूर्वी ८ सहकारी बँका अस्तित्वात होत्या व त्या काळी सुध्दा त्यांनी आपले वेगळे अस्तित्व सिध्द केले होते.

दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक लि. ने सुध्दा मराठवाड्यात व महाराष्ट्रात बाजारपेठा व आर्थिक प्रगती चा एक महत्वाचा घटक म्हणून आपली भूमिका पार पाडली आहे. इ.स.१९६६ मध्ये संस्थापक अध्यक्ष श्री रतीलालजी मोमाया यांनी बाजारपेठेची वाढती प्राप्ती लक्षात घेऊन व अनेक नागरिक व व्यापाऱ्यांची गरज ओळखून दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक लि. ची परळी येथे स्थापना केली. त्यावेळचा काळ तसा पाहिला तर बँक व्यवसायासाठी प्रतिकुल होता असे म्हणावे लागेल. कारण बँकांची संख्या ही खूप कमी व आहेत त्या बँका सरकारी बँका होत्या. अशा परिस्थितीत दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप. बँक लि. ही सहकारी बँक चालू करुन यशस्वी चालविणे ही तारेवरची कसरत होती. कारण जनतेचा विश्वास जिंकणे हे महत्त्वाचे व कठीण काम या बँकेने पार पाडले व गेल्या ५० वर्षापासून ही बँक आजपर्यंत यशस्वीपणे कार्य करत आहे.

सुरुवातीला बँकेची सभासद संख्या ही फक्त १४२ एवढी होती व आजही बँक मराठवाड्यातील एक अग्रगण्य सहकारी बँक म्हणून नावारुपास आलेली असून आजची बँकेची सभासद संख्या ही ४४८०० एवढी आहे.

३१ मार्च २०१५ अखेर भागभांडवल, स्वनिधी, ठेवी, भांडवल पर्याप्तता प्रमाण इत्यामधील वाढ समाधानकारक आहे. या वर्षात बँकेच्या ठेवत रु.३०.२५ कोटीची वाढ होऊन ३१ मार्च २०१५ अखेर बँकेच्या एकूण ठेवी रु.६९६.६० कोटी झाल्या आहेत.

बँकींग व्यवसायात कर्ज देताना जोखीम व्यवस्थापन महत्त्वाचे असते. मार्केट रिस्क, प्राईज रिस्क, ऑपरेशन रिस्क, क्रेडिट रिस्क अशा अनेक जोखमींचे व्यवस्थापन करीत बँकेने विविध प्रकारात कर्ज वाटप करुन, अहवाल वर्षात बॅकेच्या एकूण कर्जात रु.११४.२५ कोटीने वाढ होऊन वर्षाअखेर एकूण कर्जे रु.४७३.८८ कोटी इतकी झाली आहे.

रिझर्व्ह बँकेने सध्या शाखा विस्ताराच्या धोरणात उदारीकरण अवलंबिले आहे. महाराष्ट्रभर कार्यक्षेत्र असलेल्या बँकेच्या बीड, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, नांदेड, जालना, परभणी, जळगाव, औरंगाबाद, अहमदनगर, पुणे, नाशिक व मुंबई या जिल्ह्यात एकूण ४१ शाखा कार्यरत आहेत.

तसे पाहिले तर आज बरेचसे सहकारी उद्योग व बँका अडचणीत सापडलेल्या आपणास दिसून येतत व त्यापैकी काही तर विलीनीकरण होयाच्या मार्गावर आहेत. पण अशा प्रतिकुल परिस्थितीमध्ये सुध्दा दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक लि. ने आपली विश्वासहर्ता कायम ठेवून सहकार क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे. बँकेचा व्यवसाय दरवर्षी वाढत आहे व उत्तरोत्तर प्रगती होऊन नफा वाढत आहे. म्हणून या बँकेचा अभ्यास या विषयाची संशोधनासाठी निवड केली आहे.

या बँकेचे मुख्यालय हे परळी वैजनाथ असून पूर्वीपासूनच परळीची बाजारपेठ ही मराठवाड्यात लोकप्रिय गणली जाते. त्यामुळे व्यापारी उद्याजेकांना उद्योग वाढीसाठी आर्थिक

प्रेरणा देणे व व्यापार वाढीसाठी लागणारे भांडवल कर्ज रुपाने पुरवण्याचे काम दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक लि. ने केलेले आहे. त्यामुळे बाजाजारपेठ नावारुपास आणण्यामध्ये दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक लि. चे योगदान महत्वाचे ठरलेले आहे. ही बँक सर्वात यशस्वीरित्या कार्यरत आहे. म्हणून वैद्यनाथ बँकेच्या यशाचे रहस्य किंवा कारणे हा संशोधनाचा एक महत्त्वाचा विषय ठरु शकतो अशी धारणा संशोधकास संशोधनासाठी मनापासून प्रवृत्त करते.

दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक लि. ही मराठवाडा व महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग, व्यवसाय व कृषि क्षेत्र आणि शैक्षणिक क्षेत्र यांच्यासाठी कर्ज पुरवठा करणारी व गरजुंना रोजगार उपलब्ध करुन देणारी तसेच सरकारच्या विविध योजना राबविणारी एक बँक आहे. दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक लि. मागील ५० वर्षापासून ग्राहकांच्या निरंतर सोबत राहून अर्थविकासाला गती देऊन सूवर्ण महोत्सवी प्रगती करण्यात यशस्वी ठरलेली आहे. म्हणून या बँकेचे कार्य आणि व्यवस्थापन, रचना, आर्थिक धोरणे यांचा विश्लेषणात्मक अभ्यास हा बँकेचे स्वरुप व व्याप्ती लक्षात घेण्यासाठी अत्यंत महत्वाचा असल्यामुळे प्रबंधासाठी संशोधकाने हा विषय निवडलेला आहे.

## २) संदर्भ साहित्याचा आढावा :-

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने संशोधनपर लेखाचा तसेच इतर आर्थिक घडामोडीवर इ ाालेल्या विश्लेषणाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

प्रा.देसरडा एच.एम., नागरी बँकांची ढासळती आर्थिक स्थिती, अर्थमंथन, सकाळ प्रकाशन, पुणे.

प्रस्तुत लेखात महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची ढासळती आर्थिक स्थिती विशद केली आहे. जागतिकीकरणामुळे आर्थिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात स्पर्धा वाढली आहे. या स्पर्धेत जागतिक बँका उरतल्या असल्या कारणाने त्यांचा मुकाबला करण्यासाठी नागरी सहकारी बँका मोठ्या प्रमाणात अपयशी ठरत असल्याचे दिसून येते. नागरी सहकारी बँकांना या स्पर्धेत टिकून

राहण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्वतःमध्ये बदल करुन घ्यावे लागतील. या बदलात मुख्यतः प्रशासनाची फेररचना, ठेवी धोरणाची पुनर्रचना व कर्ज वाटप प्रक्रियेतील पारदर्शकता यांचा समावेश होतो. व्यवस्थापन मंडळाचे अधिकार कमी करुन बँकेच्या प्रशासनाला मोठ्या प्रमाणात अधिकार द्यावेत अशा सूचना करण्यात आलेल्या आहेत.

**फिलिक्स हेडन, ग्लोबलायझेशन ॲण्ड इंडियन बँकिंग, इंडियन एक्सप्रेस, मुंबई**

या लेखात जागतिक बँकेच्या व्याजदराविषयी तसेच विकसित राष्ट्रातील बँकेच्या व्याजदरांची भारतीय बँकेच्या व्याजदराशी तुलना करुन भारताच्या तुलनेत इतर विकसित राष्ट्रात कर्जावर आकारला जाणारा व्याजदर अतिशय कमी आहे. हा व्याजदर भारतीय बँकेच्या तुलनेत अतिशय कमी असून त्यामुहे कर्जाची परतफेड योग्य वेळी व योग्य प्रकारे होते. यामुळे महागाईवर नियंत्रण राहते. भारतीय बँकांचा व्याजदर घटविण्यासाठी भारतीय बँकांनी व्यवहाराचे संगणकीकरण करुन व्यवहारामध्ये गतिशिलता आणावी त्यामुळे बँकेचा प्रशासकीय व अनावश्यक खर्च कमी करुन बँकेला व्याजदर कमी करता येतील.

**चौसाळकर वसंत, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

प्रस्तुत शोध निबंधात संशोधकाने बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्ययन केले आहे. बँकेने केलेला कर्जपुरवठा व अपुऱ्या कागदपत्राच्या आधारे व संचालकांच्या शिफारशीमुळे त्यांच्या मर्जीतील लोकांना केल्याचे दिसून येते. संचालक मंडळ कर्ज प्रकररणात वारंवार हस्तक्षेप करताना दिसून येते. तसेच कर्जाच्या वसुलीबाबत संचालक मंडळाची उदासीनता, बँकेत होणारे राजकारण या सर्व कारणांमुळे बँकेची आर्थिक स्थिती हालाखीची बनली आहे. बँकेकडील गंगाजळी मोठ्या प्रमाणात घटली असून त्यामुळे ठेवीदारांना बऱ्याचवेळा अडचणींना तोंड द्यावे लागते.

**सुतार राजेश, भारतीय बँकांपुढील आव्हाने, दैनिक लोकसत्ता, मराठवाडा आवृत्ती, औरंगाबाद**

सदरील लेखात भारतीय बँकांपुढील आव्हानांचे विश्लेषाण केले आहे. यात राष्ट्रीयीकृत बँका, ग्रामीण बँका, मध्यवर्ती सहकारी बँका व नागरी सहकारी बँका यांचे क्रमवार विश्लेषण करुन त्यांच्यापुढील समस्या मांडल्या आहेत. या समस्या सोडविण्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना सुचविल्या आहेत. भारतीय बँकांपुढील आव्हानात कर्जवाटप धोरणात आमुलाग्र बदल आवश्यक असल्याचे सूचविले आहे. बँककांची प्रचलित कर्जे पध्दती, बँकांना अडचणीत आणणारी ठरत आहे. कर्ज प्रक्रियेत पारदर्शकता नसल्यामुळे बँकांची कर्ज वसूली कमी झाली आहे व बुडीत कर्जाचे प्रमाण वाढले आहे.

**डॉ.जाधव नरेंद्र, इंडियन बँकींग ॲण्ड ग्लोबल बँकींग, इंडिया टुडे, नवी दिल्ली**

प्रस्तुत लेखात भारतीय बँकींग ही जागतिक दर्जाची होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सूचना केल्या आहेत. भारतीय बँकींग पध्दतीत असणारे दोष दाखवून त्यांना टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाय योजना सूचविण्यात आल्या आहेत. भारतीय बँकींग पध्दतीमध्ये विशेषत: नागरी बँकांमध्ये ठेवी व कर्ज यांचा समतोल साधला जात नसल्याचे दिसून येते. तसेच यांच्यावर असणारे रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण या बँका पाळत नाहीत. राजकीय हस्तक्षेपामुळे रिझर्व्ह बँक अशा बँकांवर कारवाई करु शकत नाही. त्यामुळे या बँकांच्या गुणवत्तेत सुधारणा होण्यास मोठ्या प्रमाणात अडथळे येत असल्याचे दिसते.

**डॉ.गाडगीळ वसंत, चालेंजेस टु इंडियन बँकींग, इकॉनॉमिक टाईम्स, मुंबई**

प्रस्तुत लेखात भारतीय बँकेपुढील आव्हानांचा उहापोह केला आहे. भारतीय बँकींग पध्दतीमध्ये असणारे दोष दूर करुन त्यांना जागतिक दर्जा प्राप्त करुन देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सूचविण्यात आल्या आहेत. भारतीय बँकापुढील सर्वात मोठे आव्हान कर्जाची वसूली ही असून ठेवीमध्ये होणारी घट ही त्याची दूसरी बाजू आहे. कर्ज पुरवठा करतेवेळी

बँकाकडून घेतल्या जात असलेल्या कागदपत्रात मोठ्या प्रमाणात त्रुटी राहतात. किंबहुना त्या जाणीवपूर्वक ठेवल्या जातात. त्यामुळे भारतातील बँकांची अवस्था बिकट झाली आहे. विशेषतः सर्व प्रकारच्या सहकारी बँका दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर असल्याचे दिसते.

## ३) संशोधनाचे महत्त्व :-

संशोधनासाठी "दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँकेचा आर्थिक अभ्यास" या विषयाची निवड केली आहे. कारण कोणत्याही सहकारी संस्थेचा किंवा सहकारी बँकेचा विचार केल्यास असे दिसून येते की, जवळपास सर्व सहकारी बँका ह्या जनतेच्या विश्वासर्हतेवर चालत असतात. आपल्या बँकेकडे असलेल्या ठेवी सुरक्षित रहाव्यात व पाहिजे तेंव्हा पैसे परत मिळावेत व पैशाचा वापर करता यावा. तसेच व्यापारी, उद्योजक व इतर नागरीकांना योग्य व्याज दरात कर्ज उपलब्ध करुन देऊन त्यांची धनाड्य सावकारांच्या जाचक कर्जाच्या विळख्यातून मुक्तता करणे ह्या मुख्य उद्येशाने सहकारी बँका कार्य करत असतता व यातूनच बँक व्यवसाय आपली पुढील वाटचाल करत असते.

परळी शहर हे तालुक्यांचे ठिकाण असल्याने त्या मानाने तसेच जिल्ह्याच्या तुलनेने छोटे आहे. परंतु येथील लोकप्रिय बाजारपेठ व बँकांना व्यापारी व नागरिकांकडून मिळणारा प्रतिसाद हा निश्चितच चांगला आहे. म्हणूनच येथे ११ सहकारी बँका तसेच ७ सरकारी बँका व १२ पतपेढ्या कार्यरत आहेत. यावरुन शहराच्या आर्थिक स्थितीची कल्पना येते व या सर्व बँकांमध्ये दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक लि. ही अग्रस्थानी आहे व मराठवाड्यातील एक नामांकित सहकारी बँक म्हणूनही ओळखली जाते. त्यामुळे बँकेच्या कार्याची सखोल माहिती मिळविण्यासाठी संशोधन करुन बँक, सभासद, व्यापारी, उद्योजक, शेतकरी आणि सर्व संबंधितासमोर येणाऱ्या अडचणी व त्या सोडविण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी बँकेच्या संशोधनात्मक अभ्यासाची निवड केली आहे.

## ४) समस्या सुत्रण :-

मध्यमवर्गातील व कनिष्ठ वर्गातील लोकांच्या गरजा पूर्ण करण्याच्या उद्येशाने नागरी सहकारी बँका निर्माण झाल्या आहेत. भारतात या स्वरुपाच्या बँका स्वतंत्रपूर्व काळात अस्तित्वात होत्या. या बँका प्रामुख्याने मध्यमवर्गीय, लहान व्यापारी, छोटे उद्योजक यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करतात. १९६५ नंतर रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांचा देशात प्रसार होण्यासाठी अशा बँकांना राज्यभर शाखा काढण्याची परवानगी दिली. त्यामुळे वाढत्या शहरीकरणाबरोबरच या बँकांच्या झ ापाट्याने विकास झाला. नागरी सहकारी बँकांचा विकास केवळ संख्यात्मक स्वरुपाचा आहे. कारण त्यांच्याकडून उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या सेवांची गुणवत्ता निम्न दर्जाची आहे. वेगाने विस्तार पावणाऱ्या खाजगी आणि बहुराष्ट्रीय बँकांशी स्पर्धा करण्याची क्षमता बहुतेक नागरी सहकारी बँकात नसल्यामुळे त्यांचे अस्तित्व संपुष्टात येण्याचा धोका आहे. नागरी सहकारी बँकात नसल्यामुळे त्यांचे अस्तित्व संपुष्टात येण्याचा धोका आहे. नागरी सहकारी बँकांच्या अंगभूत दोषामुळे अनेक समस्या उद्‌भवल्या आहेत. मोठ्या प्रमाणावर नागरी सहकारी बँका बंद पडत आहेत. तसेच त्यांचा कारभार पारदर्शक व समाधानकारक दिसून येत नाही.

## ५) संशोधनाचे उद्देश :-

१. दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँकेच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास व मूल्यमापन करणे.

२. सभासदाच्या आर्थिक विकासात दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँकेची भूमिका अभ्यासणे.

३. दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँकेच्या व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.

४. दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँकेच्या विविध समस्यांचा अभ्यास करणे व त्यावर उपाय सुचविणे.

५. दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँकेच्या सर्व संबंधित घटकांच्या आर्थिक व सामाजिक जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

## ६) संशोधनाची गृहितके :-

१. ठेवीदार, कर्जदार, ग्राहक, व्यापारी व उद्योजक आणि शेतकरी तसेच सभासदांना दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँकेमुळे आर्थिक व सामाजिक लाभ होत आहे.

२. दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँकेची आर्थिक प्रगती होत आहे, परिणामतः नफ्यात वृध्दी होत आहे.

३. दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँकेच्या कार्यक्षेत्रातील आर्थिक दुर्बल घटकांचा व शेतकऱ्यांचा विकास झालेला आहे.

४. उद्योग, व्यवसाय व व्यापारास तसेच शेतीस चालना मिळाली आहे.

## ७) संशोधन पध्दती :

संशोधक अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोताच्या आधारे माहिती जमा करणार आहे.

१) **प्राथमिक स्त्रोत :** निरीक्षण, मुलाखात, प्रश्नावली इत्यादींच्या सहाय्याने प्राथमिक माहिती जमा केली जाईल.

२) **दुय्यम स्त्रोत :** पुस्तके, मासिके, बँकांचे अहवाल, लेखा पुस्तके, वर्तमानपत्रे इत्यादी मार्गाने माहिती जमा करण्यात येईल.

जमा केलेल्या माहितीचे शास्त्रीय पध्दतीने सांख्यिकीय पध्दतीद्वारे विश्लेषण करुन माहिती प्रदर्शित करण्यात येईल.

## ८) अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा :-

संशोधनात दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक लि. च्या सन २००६ ते २०१६ या १० वर्षातील ठेवी व कर्जे यांचा अभ्यास केला जाणार आहे.

## ९) प्रकरण योजना :-

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रकरण दुसरे - दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक व्यवस्थापन व कार्य पध्दती

प्रकरण तिसरे - दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँकेच्या ठेवीचा अभ्यास

प्रकरण चौथे - दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँकेच्या कर्जाचे विश्लेषण व मूल्यमापन

प्रकरण पाचवे - दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँकेच्या समस्या व त्यावरील उपाय योजना

प्रकरण सहावे - निष्कर्ष आणि सूचना

## १०) संदर्भ ग्रंथ सूची


१. कुलकर्णी एम.वाय. (२००४), जागतिक बँकींग प्रणाली, सप्तर्षी प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती

२. देशकर पी.टी. (१९९७), ब्रिटीशकाळातील भारतातील बँकींग, कृपाली प्रकाशन, मुंबई

३. राजमाने बी.टी. (२००५), भारतातील बँकींग प्रणाली व त्यापुढील आव्हाने, मकरंद प्रकाशन, पुणे.

४. झा श्रीकुमार (२००७), बँकींग सिस्टिम ऑफ इंडिया, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

५. वर्मा बी.एस., भारतीय बँक और वैश्विक बँक प्रणाली, मथुरा प्रकाशन, नई दिल्ली

६. आगलावे प्रदिप, संशोधन पध्दती, विद्या प्रकाशन, नागपूर

७. प्रा.देसरडा एच.एम. (२००१), नागरी बँकांची ढासळती आर्थिक स्थिती, अर्थमंथन, सकाळ प्रकाशन, पुणे.

८. फिलीक्स हेडन (२००६), ग्लोबलायझेशन ॲण्ड इंडियन बँकींग, इंडियान एक्सप्रेस, मुंबई

९.	चौसाळकर वसंत (२००६), बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

१०.	सुतार राजेश (२००७), भारतीय बँकापुढील आव्हाने, दैनिक लोकसत्ता, मराठवाडा आवृत्ती, औरंगाबाद

११.	डॉ.जाधव नरेंद्र (२००७), इंडियन बँकींग ॲण्ड ग्लोबल बँकींग, इंडिया टुडे, नवी दिल्ली.

१२.	डॉ.गाडगीळ वसंत (२००६), चालेंजेस टु इंडियन बॅकींग, इकॉनॉमिक टाईम्स, मुंबई

१३.	दि वैद्यनाथ अर्बन को. ऑप. बँक लि. चा वार्षिक अहवाल व ताळेबंद, २०१४-२०१५.

संशोधन मार्गदर्शक
**प्रा.डॉ.ए.डी.चव्हाण**
(एम.कॉम., एम.फील., पीएच.डी.)
अधिव्याख्याता
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ जि.परभणी

संशोधक
**एम.एस. निर्मळे**
(एम.कॉम., एम.बी.ए., एम.फील.)